राष्ट्रगीत

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि व्यावसायिक नैतिकता' विषयावर एकदिवसीय कार्यशाळा

कोल्हापूर (राष्ट्रगीत वृत्तसेवा) -



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (खटअउ) यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) आणि व्यावसायिक नैतिकता' या विषयावरील एकदिवसीय प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे आयोजन शनिवार, दि. १८ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले आहे.

पहिल्या सत्रात कन्या महाविद्यालय, इचलकरंजीच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रुती जोशी या 'शैक्षणिक संस्थांमधील नैतिक मूल्यांचे महत्त्व आणि शिक्षकांची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

दुसऱ्या सत्रात 'परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता' या विषयावर विवेकानंद कॉलेजचे परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, उपपरीक्षा नियंत्रक डॉ. डी. आर तुपे, डॉ. एस. आर. पाटील व प्रा. एच. व्ही. चामे हे मार्गदर्शन करणार आहेत.

तिसऱ्या सत्रात डॉ. एस. आर. कट्टीमनी, चेअरमन (खटअउ), विवेकानंद कॉलेज हे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि स्वतःची जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांच्या मार्गदर्शनाखाली खटअउ समितीने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे